# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक २ जुलै, २०२५

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : शोक प्रस्ताव :-**

**श्री.कृष्णराव धोंडिबा भेगडे, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव.**

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ)** : "महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे सन २०२०-२०२१, सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक लेखे व महालेखापाल (लेखापरिक्षा-१) महाराष्ट्र यांचा अलग लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील महामंडळाचे अनुपालन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**पाच : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

(१) **सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप**, विक्रम काळे, सतिश चव्हाण, संजय खोडके, शिवाजीराव गर्जे, प्रसाद लाड, इद्रिस नायकवडी, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात एम.डी.ड्रग्ज, ब्राऊन शुगरची तस्करी मोठ्या प्रमाण वाढली असणे, ड्रग्ज तस्करांचे थैमान माजले असून त्यांच्यावर नियंत्रण राहिले नसणे, ठाणे जिल्ह्यात नशेखोरीचा बाजार झाला असणे, माहे मे, २०२५ मध्ये एपीएमसी मार्केट, नवी मुंबई येथे ५० बांगलादेशीय नागरीकांना अंमली पदार्थ विक्री करतांना केलेली अटक, माहे जून, २०२५ मध्ये अंबरनाथ, बदलापूर येथील चहापान टपऱ्यांवर अंमली पदार्थ विक्री होत असल्याबाबत १७ लाख रुपयांचे एम.डी. ड्रग्ज तसेच वसई या ठिकाणाहून एम.डी. ड्रग्जचा साठा व ८ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ साकीनाका पोलिसांनी जप्त केले असणे, ठाणे जिल्ह्यात २ कोटी २१ लाख ८२ हजार रुपयांचे एम.डी.ड्रग्ज पावडर शिळ डायघर पोलीसांनी जप्त केली असणे, शिळ डायघर (जि.ठाणे) पोलीस ठाण्याच्या हद्दीत

अप्रकाशित प्रत

ड्रग्ज तस्कर मोठ्या प्रमाणावर वास्तव्य करीत असणे, मात्र पुढे कोणतीही कारवाई झाली नसणे, आंतरराष्ट्रीय हायड्रो गांजाचा वापर व तस्करी वाढली असणे, नवी मुंबई येथे कोकेन मोठ्या प्रमाणावर आढळून आले असणे, हायड्रो गांजा हवाई मार्ग थायलंड येथून येत असणे, मुंबई आंतराष्ट्रीय टोळी कार्यरत असणे याला पोलिस खतपाणी घालत असणे, परिणामी नागरिक व मुले व्यसनाधिन झाली असणे, नवीन पिढीस धोका निर्माण झाला असणे, दापोली (जि.रत्नगिरी) येथील दापोली-दाभोळ रस्त्यानजीक असलेल्या केळसकर नाका येथे मुस्लिम महिला व तिचे साथीदार दररोज अंमली पदार्थांची विक्री करीत असणे, या महिलेचे स्थानिक पोलीसांशी असलेल्या आर्थिक व्यवहारामुळे स्थानिक पोलिस तात्पुरती कारवाई करीत असणे, कारवाई केल्यानंतरही सदर महिला त्याच ठिकाणी पुन्हा या अंमली पदार्थाची विक्री करीत असणे, कोकणात असंख्य पर्यटक येत असून अशा प्रकारामुळे भविष्यात दापोली अंमली पदार्थ सेंटर होण्याची भीती असणे, या सर्व प्रकरणांकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२)** **श्री.राजहंस सिंह**, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"महानगरपालिका “एल” विभागातील कुर्ला (प.), एल.बी.एस. रोड व साकीनाका या परिसरात मोठ्या प्रमाणात स्थानिक महानगरपालिका प्रशासनाच्या संगनमताने २-३ मजली अनधिकृत हॉटेल्स बेधडक सुरु असल्याचे निदर्शनास येणे, ९ वर्षांपूर्वी कुर्ला (प.) येथील २ मजली अनधिकृत असलेल्या हॉटेल सिटी किनारामध्ये लागलेल्या भीषण आगीमध्ये ८ इंजिनिअरिंग विद्यार्थी मृत्युमुखी पडलेले असणे, माहे जून, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात उच्च न्यायालयाने ८ मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबियांना प्रत्येकी ५० लाख भरपाई देण्याचा निर्णय देणे, या निर्णयाने हॉटेल चालकाने नियमांचा भंग आणि अग्निसुरक्षेबाबत अग्निशमन विभागाची परवानगी नसल्याचे समोर येणे, तत्कालीन पालिका प्रशासनाने हॉटेलवर कोणतीही कारवाई न केल्याने ही भीषण आग लागल्याचे समोर येणे, पालिका प्रशासनाच्या बेजबाबदार व हॉटेल्सच्या हलगर्जीपणामुळे अशा दुर्दैवी घटना वारंवार घडत असणे, कुर्ला (प), एल.बी.एस. रोड, साकीनाका या परिसरात अशा हॉटेल्सच्या संख्येत गेल्या काही वर्षांमध्ये वाढ होत असणे, ही सर्व हॉटेल्स रात्रभर सर्रास चालू असणे, कायदा-सुव्यवस्थेचा धाक नसणे, महानगरपालिका प्रशासनाकडे स्थानिकांच्या व लोकप्रतिनिधींच्या तक्रारी करूनसुद्धा कारवाई होत नसणे, महानगरपालिका अधिकारी संगनमताने हॉटेल्सना देण्यात आलेले परवाने व अग्निशमन दलाची परवानगी तपासण्याची व अनधिकृत हॉटेल्स व बांधकामांवर कारवाई करण्याची

अप्रकाशित

आवश्यकता असणे, संगनमत असलेल्या संबंधित महानगरपालिका अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.अमित गोरखे**, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"पिंपरी-चिंचवड महापालिकेने इंग्रजी मध्ये १४ मे २०२५ रोजी ४६० पृष्ठाचा नवीन शहर मसुदा विकास आराखडा तयार करण्यात येणे,पिंपरी चिंचवड शहराची २०४१ ची लोकसंख्या लक्षात घेता विकास आराखडा जाहीर करणे,हा २८ गावांसाठी असणे, त्याचे एकूण क्षेत्रफळ १७३.२४ चौरस किलोमीटर इतके असणे शहर नियोजनाच्या दृष्टीने चुकीच्या पद्धतीने आरक्षण टाकण्यात येणे,मनपा तर्फे विशेष समिती स्थापन करण्यात येणे, जीआयएस प्रणालीद्वारे आराखडा चुकीच्या पद्धतीने तयार करण्यात येऊन बगीचा, प्रस्तावित रस्ते, मैदान,रुग्णालय, टाऊन हॉल, जनावरांसाठी दहन करण्याची व्यवस्था व पशुवैद्यकीय रुग्णालय म्युनिसिपल पर्पज, प्राथमिक माध्यमिक शाळा, जलशुद्धीकरण प्रकल्प, पाण्याची टाकी, घनकचरा व्यवस्था,मैला शुद्धीकरण प्रकल्प, भाजीमंडई, अग्निशमन केंद्र, स्मशानभूमी व दफनभूमीसाठी अशी आरक्षण वर्षानुवर्ष राहत असलेली घरे चाळी,गृहप्रकल्प, झोपडपट्ट्या , व्यावसायिक क्षेत्रांवर,आरक्षण टाकण्यात येणे चुकीच्या पद्धतीने बनवण्यात आलेला डीपी रद्द करून शहरातील नागरिकांना तात्काळ दिलासा देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.हेमंत पाटील,** वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे वगरवाडी,ता.औंढा नागनाथ,जि.हिंगोली येथील सर्वे नं.६ व ५९ मध्ये तुकडे बंदी कायदा लागू झाल्यानंतर नवीन गट नं.७, ८, ९ पडणे, सदर शेत जमीन श्री.कोंडबा नरुजी गोरे यांच्या मुळ मालकीची असणे, श्री.गोरे यांच्या वारसाकडून सदर जमिन सन १९८५ मध्ये श्री.उदय सत्यनारायण पटवारी यांनी खरेदी करणे, श्री.उदय पटवारी यांचे नावे जमिनीचा फेरफार लागून ७/१२ नावे असणे, त्यामुळे सदर जमीन श्री.उदय पटवारी यांचेकडून श्री.प्रसाद राजेंद्र महले यांनी सन २०१८ मध्ये खरेदी केलेली असणे, श्री.प्रसाद महले यांच्या नावेही जमिनीचा फेरफार लागून ७/१२ वर त्यांचे नाव येणे, तद्नंतर श्री.प्रल्हाद सखाराम मानकर यांनी तहसिलदार, औंढा नागनाथ आणि उपविभागीय दंडाधिकारी यांना हाताशी धरुन व आर्थिक देवाण-घेवाणीतून सन २००८ मध्ये सदर जमिन श्री.सुर्यभान वाशीमकर यांना विक्री केल्याची खोटी व बनावट कागदपत्रे तयार करुन सन २०२५ मध्ये फेरफार लावणे, त्यामुळे सदर जमीन खरेदी-विक्रीमध्ये श्री.प्रसाद महले यांची झालेली फसवणूक, सदर फसवणूकीस

तहसिलदार-औंढा नागनाथ आणि उपविभागीय दंडाधिकारी हे जबाबदार असणे, अशा प्रकारे अनेक शेत जमीनींचे खोटे फेरफार केल्याच्या तक्रारी उक्त महसूल अधिकाऱ्यांविरुध्द असणे, शासनाने उक्त प्रकरणी तातडीने एसआयटीमार्फत चौकशी करुन खोटी व बनावट कागदपत्रे तयार करुन खरेदी-विक्री करणाऱ्या श्री.प्रल्हाद मानकर तसेच तहसिलदार, औंढा नागनाथ आणि उपविभागीय दंडाधिकारी यांचेवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **सर्वश्री विक्रम काळे, संजय खोडके, शिवाजीराव गर्जे, अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, इद्रिस नायकवडी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात एकीकडे विद्यार्थ्यांच्या कमी पटाच्या कारणावरुन शाळांचे समायोजन करण्याचे प्रमाण सुरु असताना सन २०२५-२६ या आगामी शैक्षणिक सत्रातील समग्र शिक्षण अभियानाचा महाराष्ट्र आणि केंद्रातील शिक्षण विभागाची एप्रिल-मे, २०२५ मध्ये झालेली संयुक्त बैठक, "यूडायस" च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात एकुण एक लाख आठ हजारावर शाळा असून राज्यातील ८ हजार २१३ गावांमध्ये अद्यापही साधे प्राथमिक शिक्षण देण्यासाठी शाळा नसणे, त्यामध्ये १,६५० गांवे प्राथमिक शाळेपासून आणि ६,५६३ गांवे उच्च प्राथमिक शाळेपासून वंचित असणे, त्यामुळे गावांतील मुलांनी शिक्षण कोठे घ्यावयाचे याबाबत निर्माण झालेला प्रश्न, राज्यातील ग्रामीण भागातील मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी शासनाने ज्या गावात शाळा नाही त्या गावांत तात्काळ मुलांना शिक्षण घेण्यासाठी शाळा उपलब्ध करुन देण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **सर्वश्री.किरण सरनाईक, जयंत आसगावकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री. धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अनुदान टप्पा वाढीचा शासन निर्णय निर्गमित होऊन सात ते आठ महिने झालेले असणे, विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी टप्पा वाढ च्या प्रतीक्षेत असणे, विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिक्षक समन्वय संघाच्या माध्यमातून वेळोवेळी आंदोलने केलेली असणे, अनुदानाअभावी कित्येक कर्मचारी आत्महत्याग्रस्त झालेले असणे, विनाअनुदानित शाळांना २० टक्के लागू करण्यासाठी मूल्यांकन व इतर औपचारिकता पूर्ण झालेल्या असणे, अनुदान टप्पा वाढ शासन निर्णय निर्गमित होऊन विलंब करणे योग्य नसणे, दिनांक १ जून, २०२४ पासून विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना अनुदान

अग्रिम प्रत

देण्याची गरज असणे, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयानुसार शाळा व तुकड्यांना अनुदान टप्पा वाढ देण्यासाठी निधीची तरतूद करणेबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर -

**सात : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

(१) "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ — महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ —महाराष्ट्र (ग्रामपंचायतींच्या, जिल्हा परिषदांच्या व पंचायत समित्यांच्या विवक्षित निवडणुकांकरिता) वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत तात्पुरती वाढविणे विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(२)** "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५— महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (पाचवी सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ — महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (पाचवी सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(३)** "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२– महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सहावी सुधारणा) विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सहावी सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

आठ : **(मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) –**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, प्रसाद लाड, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री विक्रम काळे, श्रीकांत भारतीय, कृपाल तुमाने, संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री किशोर दराडे, इद्रिस नायकवडी, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, पंकज भुजबळ, डॉ.परिणय फुके, सर्वश्री हेमंत पाटील, किरण सरनाईक, राजहंस सिंह, रणजितसिंह मोहिते-पाटील, दादाराव केचे, सदाशिव खोत, संजय केणेकर, अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंत खंडेलवाल, विक्रांत पाटील, संदीप जोशी, योगेश टिळेकर, धर्मगुरु राठोड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरू)**

"राज्यातील मुंबई, एमएमआरडीए, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर इ. महसुली जिल्हे व्यापारदृष्ट्या एकमेकांशी जोडलेले असणे, मुंबई तर देशाची ग्रोथ इंजिन असणे, मुंबई आणि जेएनपीटी पोर्टनंतर वाढवण बंदर राज्याला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार असणे, याठिकाणी नव्या विमानतळाची उभारणी करण्याबरोबरच नवी मुंबई, नैनाच्या माध्यमातून तिसरी आणि वाढवण बंदर प्रकल्पाच्या ठिकाणी चौथी मुंबई वसविण्याचे प्रस्तावित असणे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ प्रस्तावित असणे, वाढवण बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रीक टन मालाची हाताळणी करणे शक्य असणे, महाराष्ट्रासह देशाच्या विकासात हे बंदर 'गेमचेंजर' ठरणार असणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेचे चतुर्थ श्रेणी कामगार तसेच गिरणी कामगार यांच्या घरांचा प्रश्न तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगर,

अग्रिम प्रत

टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई उपनगरातील जुन्या व अत्यंत मोडकळीस आलेल्या भाडेकरूंच्या इमारतींना महापालिकेने नोटीस दिल्यानंतर व महापालिकेने किंवा घरमालकाने तोडल्यानंतर १५-१५ वर्षे त्या तशाच अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या मोठया शहरांच्या मेगापॉलीस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ही महानगरे जागतिक पटलावर उच्च दर्जाची व्हावी ही शासनाची महत्वांकाक्षा असणे, मुंबईसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ६४,७८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, "ग्रोथ हब" संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेशात ७ जागतिक व्यापार केंद्रे विकसित करण्याची योजना असणे, "वेव्हज" परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि देशभरातील माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्राला ग्लोबल प्लॅटफॉर्म प्राप्त होण्यासोबतच मुंबई जागतिक माध्यम-मनोरंजन उद्योगाची राजधानी म्हणून विकसित व्हावी हा शासनाचा निर्धार असणे, यामध्ये मेट्रो जाळयाचा विस्तार, रस्ते विकास व वाहतुक सुविधांचा समावेश असणे, मुंबई, पुणे आणि नागपूर मध्ये १४३.५७ कि.मी. चे मेट्रोमार्ग कार्यरत असणे, नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर (इनोव्हेशन सिटी) उभारण्यात येणार असणे, पुणे शहरात पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्हयातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर विचार करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाडयांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतीमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी शहरे विकसित करण्याची व तेथील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, मुंबई, नागपूर व पुणे महानगरातील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा व वातानुकुलीत वाहतुक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एकूण १४३.५७ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले असणे, ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली असणे, पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या दोन मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असणे, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम दृष्टीक्षेपात असणे, नवी मुंबईतील उलवे येथे १,१६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतराराष्ट्रीय विमानतळाचे काम ८५ टक्के पूर्ण झालेले असणे, गडचिरोली हा विकसित जिल्हा बनला असून त्याठिकाणी खनिज संपत्तीचा योग्य वापर करण्यात येऊन 'गडचिरोली स्टील सिटी' हा महत्वाकांक्षी प्रकल्प तेथे साकारण्याचे प्रयोजन असणे जेणेकरुन त्या भागात मोठया प्रमाणावर रोजगार

अप्रकाशित प्रत

निर्मिती होऊ शकेल, मुंबई-नागपूर समृध्दी द्रुतगती मार्ग गोंदिया आणि गडचिरोलीला जोडण्याचे प्रस्तावित असणे, नागपूरच्या भोसले राजघराण्यातील राजे रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून आपल्या राज्यात परत आणण्यात राज्य शासनाला मिळालेले ऐतिहासिक यश, राज्यात एआय पॉलिसी, एआय विद्यापीठ, सायबर सिक्युरिटी इ. धोरणांची अंमलबजावणी करण्यात राज्य अग्रेसर असणे, महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला भविष्यातील विकासासाठी जोडण्याचा या शासनाचा प्रयत्न असून सुखी, संपन्न, समृध्द, प्रगत, पुरोगामी सुधारणावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात सर्वाधिक प्रदूषणाच्या यादीत गणल्या जाणाऱ्या चंद्रपुर जिल्हात प्रदूषणामुळे मागील सहा महिन्यांमध्ये ५५ जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक बाब माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, याच कालावधीत चंद्रपुर जिल्ह्यात ४ हजार ९९५ रुग्ण आढळून येणे, चंद्रपूर वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात एकूण रुग्णांच्या संख्येपैकी दमा, रेस्पिरेटरी इन्फेक्शन, ब्रॉन्कायटीस, फुफुसाचा कर्करोग व इतर श्वसनाचे विकार असलेल्या रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात आढळून येत असणे, सन २०२१ ते सन २०२४ या मागील चार वर्षात विविध विकारांचे ३३ हजार १९० रुग्ण आढळून आले असून त्यात श्वसनाच्या विकाराचे सर्वाधिक रुग्ण असणे, चंद्रपूर जिल्ह्यात जल,वायू आणि ध्वनीसह विविध प्रकारच्या प्रदूषणामुळे अनेक नागरिकांचा बळी जात असताना पर्यावरण विभागाचे त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे चंद्रपूर जिल्हा प्रदूषण मुक्त करण्यासाठी शासनाने पथदर्शी प्रकल्प (Pilot Project) राबवून त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

(२) **ॲड. अनिल परब, सर्वश्री. सचिन अहिर, सुनिल शिंदे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

" महाराष्ट्राची जीवनदायिनी अशी सार्थ ओळख असलेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची आर्थिक दुरवस्था झालेली असणे, दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीचे पालन न करता माहे एप्रिल, २०२३ ते माहे जानेवारी, २०२५ अखेरची तुटीची रुपये ९९३ कोटी इतकी रक्कम शासनाने दिलेली नसणे, महामंडळाचे उत्पन्नात वाढ नाही त्यामुळे शासनाकडून मिळणा-या सवलत मुल्याच्या रकमेतून केवळ कामगारांना वेतन देण्यात येत असणे,

अप्रकाशित प्रत

महामंडळाकडे नुकतीच १४.९५ टक्के भाडेवाढ केली, त्यामुळे ६३ लाख प्रवासी कमी झाले असणे, कामगारांचे वेतन ७ तारखेपर्यंत देणे बंधनकारक असतांना ते १० तारखेला देण्यात येते, मागील ३ वर्षात महामंडळातील अनेक गैरव्यवहार निदर्शनास येणे, १३१० बसेस व ई-बस खरेदीत झालेला मोठया प्रमाणातील गैरव्यवहार, वाहतूक खात्यातील भ्रष्टाचार, लेखा खात्यातील अनागोंदी कामकाज या सर्व बाबींबाबत विधानपरिषदेत विविध आयुधांद्वारे शासनाचे लक्ष वेधूनही सदर गैरव्यवहारासंदर्भात महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून विधानमंडळास दिशाभूल करणारी माहिती पुरविली जात असणे, त्यामुळे गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई होत नसणे व गैरव्यवहारात दिवसेंदिवस वाढ होत असणे, तरी महामंडळाच्या या स्थितीला जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई होण्याची आवश्यकता असून त्याकरिता सदर गैरव्यवहाराची चौकशी एसआयटी मार्फत करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १ जुलै , २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत